## दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात
## नियमित दिवाणी मुकदमा नं. २३/२०२२
## निशाणी ३३ लगत आदेश

( हफीजा विरुध्द शफुद्दीन व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ११यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेचा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ११ हे मोटरसायकलवरुन पडल्याने आजारी होते. त्यामुळे त्यांना कैफियत देण्यास २८ दिवस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही. सदरचा विलंब माफ होणे आवश्यक आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे व प्रतिवादींचा अर्ज नाकारला आहे. वादीचे कथन की, अर्जातील मजकुर खोटा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करावयाचा झालेस खर्च देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी

दाखल केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. ११ यांनी **रु. २००/–** खर्च देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी खर्चाचे रकमेपैकी रु. १००/– वादी यांना अदा करावेत व उर्वरित रु. १००/– न्यायालयात शासन नावे जमा करावेत.

३. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

सांगोला.
दिनांक – ०३/०२/२०२५.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 03/02/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 04/02/2025 |